अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/ 2433
दिनांक :- 9८/०८/2020

# -: आदेश :-

विषय :- <u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.</u>
पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोविड-१९ करिता बेड नियंत्रण कक्षासाठी कर्मचारी उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) आदेश जा.क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/२२४६, दि.०८/०७/२०२०.

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये यासाठी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोविड-१९ करिता शासकीय व खाजगी दवाखाने यांचेसाठी कामकाजाबाबत नियमावली तयार करण्यात आली आहे.

त्यानुसार बेडचे व्यवस्थापनाशी संबंधित कामे जसे, कोविड-१९ च्या संबंधित सर्व रुग्णालयांकडून रिक्त बेडची माहिती घेऊन डॅश बोर्ड अद्यावत (Update) ठेवणे, इ. कामकाजाकरिता संदर्भ क्र. ४ च्या आदेशान्वये श्री. व्ही.जी. कुलकर्णी, मुख्य अभियंता (पथ) यांची नियुक्ती करणेत आली आहे. तसेच, शासकीय व खाजगी दवाखाने यांचेकडील बेडच्या व्यवस्थापनाकरिता मुख्य इमारतीमध्ये ३ रा मजला येथे बेड नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

श्री. व्ही.जी. कुलकर्णी, मुख्य अभियंता (पथ) यांच्या नियंत्रणाखाली बेड नियंत्रण कक्षाकरिता खालीलप्रमाणे शिपाई यांची नियुक्ती करणेत येत आहे.

| अ.क्र. | सेवकाचे नाव | हुद्दा | खात्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रमोद विश्वनाथ निंबाळकर | शिपाई | पथ विभाग |
| २ | श्री. अजिंक्य सोमेश्वर गायकवाड | शिपाई | दक्षता विभाग |
| ३ | श्री. सागर ज्ञानेश्वर जाधव | शिपाई | उद्यान विभाग |
| ४ | श्री. सचिन विलास टाक | शिपाई | मंडई विभाग |
| ५ | श्री. रोशन उमेश देशमुख | शिपाई | मालमत्ता विभाग |

वरील शिपाई कर्मचारी यांनी ते रुजू झालेबाबत डॉ. मनिषा नाईक, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांचेकडे अहवाल सादर करावा.

वरील कर्मचाऱ्यांस या कार्यालयीन आदेशान्वये प्रत्यक्ष कामकाजासाठी नेमून दिलेल्या ठिकाणी हजर होणेकरीता तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत आहे. यासाठी स्वतंत्र कार्यमुक्ती आदेशाची आवश्यकता नाही. उपरोक्त सेवक नेमून दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास व सदरच्या कालावधीत या कामास नकार देणा-या हलगर्जीपणा करणा-या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

वरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती या कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहे.

वरील कर्मचाऱ्यांचे महिनेमहाचे वेतन त्यांचे मुळ नेमणूक खात्याने आदा करावयाचे आहे. तरी संबंधीत खातेप्रमुख / प्रशासन अधिकारी यांनी पुढील योग्यती तजवीज करावी.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत - मा. महापालिका आयुक्त,
मा. अतिरिक्त आयुक्त (वि) यांना माहितीस्तव.

प्रती – संबंधीत खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका.